जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती


दुरध्वनी क्र.०७२१-२६६२४९३ फॅक्स क्र. २६६२८४३ इपीबिएस क्र.२६६२४१८

(आधार विभाग)

Email Id: rdc_amravati@gmail.com/edpm.amravati@maharashtra.gov.in Website: Amravati.gov.in


---

क्र.कक्ष-आधार/क.लि./कावि-९६८/२०१६ दि. १९/१२/२०१६

प्रति,

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण, अमरावती.
२. सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती.

**विषयः- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आधार नोंदणी पूर्ण करणे बाबत.**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते कि अमरावती जिल्हयाची एकुण लोकसंख्या ३,०५,५१,९५ इतकी असून त्यापैकी ७,२६,१२२ लोकसंख्या हि ५ ते १८ वर्षे वयोगटातील व २०,९६,२५७ लोकसंख्या १८ वर्षे वयोगटावरील असून त्यामधील ब-याच प्रमाणात आधार नोंदणी बाकी आहे. त्यामुळे आपले अंतर्गत येणारे सर्व महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, तसेच सर्व शैक्षणिक संस्थेमधील शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी यांचे १०० टक्के आधार नोंदणी करावयाचे बाकी आहे. करिता दि.१७.१२.२०१६ रोजीच्या आढावा बैठकिमध्ये याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. सदर बैठकित सर्व शिक्षणाधिकारी व आपले प्रतिनीधी हजर होते. बैठकिमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत येणारे सर्व महाविद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, तसेच सर्व शैक्षणिक संस्थेमधील शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी यांचे १०० टक्के आधार नोंदणी करण्याकरीता आपले अधीनस्त महाविद्यालय/संस्थेअंतर्गत शिल्लक आधार नोंदणी बाबत आढावा घेऊन आधार नोंदणी करीता शिल्लक लाभार्थी संख्येसह माहिती श्री. अंकुश अंबोरे, विभागीय व्यवस्थापक, सीएमएस कम्पुटर्स, लिमीटेड यांचे मो.क्र.०९४२३६५९६६१ व ई-मेल आयडी ankush_ambhore@cms.co.in या वर पाठविण्यात यावी.

त्यांच्याशी समन्वय करुन VLE मार्फत आपले अधीनस्त महाविद्यालये/संस्थेत शिबीर आयोजित करुन शिल्लक आधार नोंदणीचे काम त्वरित पूर्ण करुन तसा अहवाल सादर करण्यात यावा.

**जिल्हाधिकारी, अमरावती**

---

पृष्ठांकन क्रः-विकाअ/शिक्षण/आधार/२०१७/ 395
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 10 FEB 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) प्राचार्य, सर्व संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थलावर टाकण्याकरीता.